<u>केंद्र पुरस्कृत योजना सन २०२६-२७</u>

"वन्यजीव अधिवासाचा एकात्मिक विकास" या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत सर्वसाधारण घटकांतर्गत निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग,

शासन निर्णय क्र. डब्ल्यूएलपी- ०७.२६/प्र.क्र.२५८/फ-१

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई ४०००३२.

दिनांक : ११.०८.२०२६.

वाचा :-

१. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९.०४.२०२६.
२. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०७.०५.२०२६.
३. केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल, मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. १३-१३/२०२० डब्ल्युएल -I, दि. ०२.०७.२०२६.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपुर यांचे पत्र क्र. कक्ष-१/सी/यो/प्र. क्र. ०६/१०३/२०२६-२७, दि.१५.०७.२०२६.

प्रस्तावना :-

सन २०२६-२७ मध्ये केंद्र शासनाने संदर्भ क्रमांक ३ च्या पत्रान्वये "वन्यजीव अधिवासाचा एकात्मिक विकास" या योजनेअंतर्गत राज्यातील ३१ संरक्षित क्षेत्रांच्या विकासात्मक कामांकरीता सर्वसाधारण घटक, घटक, अनुसुचित जाती उपयोजना व आदिवासी क्षेत्र उपयोजना घटकांतर्गत रु. ७५९४.९५ लक्ष रक्कमेचा वार्षिक प्रर्वतन अहवाल मंजूर केला असून रु. ३९५.५६९६२ चा प्रथम हप्ता मंजूर केला आहे. त्या अनुरुप सर्वसाधारण घटक व अनुसुचित जाती उपयोजनाअंतर्गत राज्य हिस्सा रु. २६३.७१४ लक्ष वितरीत करणे अपेक्षित आहे.

शासन निर्णय :-

सदर शासन निर्णयान्वये "वन्यजीव अधिवासाचा एकात्मिक विकास" या केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत दिनांक ०२.०७.२०२६ रोजीच्या पत्रान्वये राज्यातील ३१ संरक्षित क्षेत्रांच्या विकासात्मक कामांकरीता फक्त सर्वसाधारण घटकांतर्गत केंद्र हिस्स्यांतर्गत रु. १९७.७८९६२ लक्ष व त्या अनुरुप राज्य हिस्स्यांतर्गत रु. १३१.८६ लक्ष असे एकूण रु. ३२९.६५ लक्ष निधी खर्च करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

i. वन्यजीव अधिवासाचा एकात्मिक विकास या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत होणारा खर्च I) अनावर्ती व आवर्ती सर्वसाधारण घटक कार्यबाबींसाठी ६०% करीता रु. १९७.७८९६२ लक्ष लेखाशिर्ष क्रमांक २४०६ वनीकरण व वन्यजीवन, ०२ पर्यावरणीय वनीकरण व वन्यजीवन, ११०, वन्यजीवन संरक्षण, (००) (०३) वन्यजीव आश्रयस्थांनाचा एकात्मिक विकास (सर्वसाधारण) (६०% केंद्र हिस्सा) (कार्यक्रम) (२४०६ ०७८४) II) त्या अनुरुप राज्य शासनाचा हिस्सा ४०% करीता रु. १३१.८६ लक्ष लेखाशिर्ष क्रमांक २४०६ वनीकरण व वन्यजीवन, ०२ पर्यावरणीय वनीकरण व वन्यजीवन, ११०, वन्यजीवन संरक्षण, (००)(१६) वन्यजीव आश्रयस्थांनाचा एकात्मिक विकास (सर्वसाधारण) (४०% राज्य हिस्सा) (कार्यक्रम) (२४०६ २३८४) च्या सन २०२६-२७ मध्ये अर्थसंकल्पित वितरण प्रणालीद्वारे उपलब्ध होणा-या अनुदानातून खर्च करण्यात यावा.

ii. सदर शासन निर्णयान्वये वितरीत केलेला निधी SNA-SPARSH प्रणालीद्वारे खर्च करण्यात यावा. त्याकरीता ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या उदिष्टांतर्गत उपल्बध असलेल्या निधीचा विनीयोग करण्यात यावा.

iii. सदर शासन निर्णयान्वये वितरीत केलेला निधी केंद्र शासनाने संदर्भीय पत्रान्वये मान्यता दिलेल्या तपशीलवार कार्यबाबींवर व सदर कामांना सक्षम प्राधिका-याची प्रशासकीय व तांत्रिक मान्यता असल्याखेरीज रक्कम खर्ची टाकण्यात येऊ नये.

iv. वितरीत केलेला निधी केंद्र शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार योजनेत विहीत केलेल्या मर्यादेत, प्रचलित नियमांच्या अधीन राहून व वित्त विभागाने वेळोवेळी विहीत केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तसेच केंद्र शासनाने प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यबाबींच्या अनुषंगाने खर्च करण्यात यावा.

v. प्रस्तावित असलेल्या मोठया बांधकामासाठी शासनाने दिलेल्या सूचना आणि विहीत केलेली कार्यपद्धती अनुसरण्याची जबाबदारी संबंधीत नियंत्रक/अंमलबजावणी अधिकारी यांची राहील.

vi. वित्त विभागाने निर्गमित केलेल्या विविध मार्गदर्शन सूचनांचे वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९.०४.२०२६ व वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०७.०५.२०२६ चे काटेकोर पालन करावे.

२. सदर शासन निर्णय वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०९.०४.२०२६ व वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक :- अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दिनांक ०७.०५.२०२६ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८१११५१२१८०२४० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHRIDHAR VIKRAM DESHMUKH

Digitally signed by SHRIDHAR VIKRAM DESHMUKH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forest Department,
2.5.4.20=D3DD41251A6E229D40D43D90520B8D2A921AE59C8013644628B65C38D28868D8, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=912CC46938BC6D9CF9A14E38D8B09ED7F8FD6E5EE2A4A245C1C55A32E6315D48, cn=SHRIDHAR VIKRAM DESHMUKH
Date: 2026.08.11 16:50:46 +05'30'

(श्रीधर देशमुख)
कक्ष अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम, मुंबई / पुर्व, नागपूर.
५. सर्व मुख्य वनसंरक्षक / वनसंरक्षक / उपवनसंरक्षक (प्रादेशिक),
६. सर्व मुख्य वनसंरक्षक / वनसंरक्षक / उपवनसंरक्षक (वन्यजीव),
७. कोषागार अधिकारी, नागपूर.
८. महालेखापाल-१/२ (लेखापरीक्षण /लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
९. फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ (निवडनस्ती)

*****